नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८०/२०२२
(अरुण सगुण धुरी वि. वासुदेव हरी केरकर)

## :– निशाणी १८ खालील आदेश –:

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी वादीचा दावा आवश्यक पक्षकार न केल्यामुळे काढून टाकण्यात यावा याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने दाव्यातील परिच्छेद १ मध्ये गाव मौजे जांभरमळा ता. कुडाळ सर्वे नं. ६५अ हिस्सा नं. १९, ४, ३०, १३ या मिळकतीचा उल्लेख केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, सदरील मिळकतीमध्ये वादविषयक रस्ता आहे. परंतु, सदरहु मिळकतीचा सातबारा पाहिला असता त्यामध्ये कांचन राजेंद्र पावसकर, जयश्री हरी केरकर, भक्ती बाळकृष्ण म्हाडगुत, वासुदेव हरी केरकर, स्नेहलता यशवंत भगत यांची नावे असलेली दिसतात. वादीने दाव्यामध्ये सदरील आवश्यक पक्षकार दाव्यात न धरल्यामुळे दावा रद्द होणारा आहे. सबब, वादीचा दावा आवश्यक पक्षकार न केल्यामुळे काढून टाकण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. वादीने सदर अर्जावरच आपले म्हणणे देवून सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, सदरचा दावा ताकिदीकरीता असल्याने आवश्यक ते व ज्यांनी कृत्य केलेले आहे त्यांना पक्षकार केलेले आहे. त्याचप्रमाणे इतर लोकांना पक्षकार करण्याची आवश्यकता आहे. तरी प्रतिवादी यांचा अर्ज धादांत खोटा व खोडसाळ असून तो फेटाळण्यास पात्र आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादीचे दाव्यातील वादकथने व मागणीचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द कायम ताकिदीसाठी दाखल केलेला दिसून येतो. तसेच, दाव्याचे कारण हे प्रतिवादीविरुध्द असल्याचे वादी यांचे दाव्यातील कथनांवरुन

दिसून येते. वादीने प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार केले किंवा कसे ही बाब दाव्यातील पुरावा व सदरचा दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत करताना लक्षात घेता येऊ शकतो. प्रस्तुत प्रकरणात वादमुद्दे निश्चीत केलेले नसून वादी यांनी दाव्यात आवश्यक पक्षकार केलेत किंवा कसे हा कायदेविषयक मुद्दा निश्चीत करुन दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी त्याचा विचार करता येईल. तसेच, दाव्याच्या सदरच्या टप्प्यावर वादीने दाव्यात आवश्यक पक्षकार न केल्याने दावा काढून टाकणेबाबत कायदेविषयक तरतुद नाही. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. उपरोक्त विवेचनावरुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**–: आदेश :–**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

PAWAN RAMBHAU DHORE
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.03.27 18:38:43 +0530

दिनांक– २६/०३/२०२४

(प.रा.ढोरे )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.